RNI No. MAHBIL /2009/31733

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ९, अंक २४] सोमवार, फेब्रुवारी २७, २०२३/फाल्गुन ८, शके १९४४ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ५३**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### विधि व न्याय विभाग

५ वा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ फेब्रुवारी २०२३.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम.**

क्रमांक न्यायस्था-२०२०/प्र.क्र. ६६/कार्यासन-११.— महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम (१८६९ चा १४) याची कलमे २१, २२अ व २३ यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि त्याबाबतीत यापूर्वी काढलेल्या इतर सर्व अधिसूचना, जेथवर त्या रायगड-अलिबाग जिल्हा न्यायालयास दुय्यम असलेल्या रायगड-अलिबाग जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, माणगाव यांच्या न्यायालयाशी संबंधित असतील तेथवर, त्यामध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे असे निदेश देत आहे की, दिनांक ५ मार्च २०२३ पासून,

(क) रायगड-अलिबाग जिल्ह्यामध्ये माणगाव येथे जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यास दुय्यम असलेले एक दिवाणी न्यायालय असेल ;

(ख) दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर हे, उक्त न्यायालयाचे पीठासीन अधिकारी असतील आणि ते रायगड-अलिबाग जिल्ह्यातील माणगाव येथे त्यांचे न्यायालय भरवतील ; आणि

(ग) दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, माणगाव, जिल्हा रायगड-अलिबाग यांच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या सीमांमध्ये रायगड-अलिबाग जिल्ह्यातील महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, रोहा व पाली या महसुली तालुक्यांचा समावेश असेल आणि जे तालुके यापूर्वी दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अलिबाग यांच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये समाविष्ट होते ते तालुके त्यामधून वगळण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नि. वि. जिवने,**
शासनाचे विधि सल्लागार-नि-सहसचिव.

COURT BOOK
EMPOWERING LEGAL CLARITY

**LAW AND JUDICIARY DEPARTMENT**

5th Floor, Main Building, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 27th February 2023.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA CIVIL COURTS ACT.

No. Nyayastha 2020/C.R.66/DESK-11.— In exercise of the powers conferred by sections 21, 22A and 23 of the Maharashtra Civil Courts Act (XIV of 1869), and of all other powers enabling it in this behalf, and in partial modification of all the earlier notifications issued in this behalf, in so far as they relate to the Court of Civil Judge, Senior Division, Mangaon in Raigad-Alibag District sub-ordinate to the District Court of Raigad-Alibag, the Government of Maharashtra, hereby directs that, with effect from 5th March 2023,

(*a*) there shall be a Civil Court at Mangaon in Raigad-Alibag District sub-ordinate to the District Court, Raigad-Alibag ;

(*b*) the said Court shall be presided over by the Civil Judge, Senior Division, who shall hold his Court at Mangaon in Raigad-Alibag District; and

(*c*) the local limits of the ordinary jurisdiction of the Civil Judge, Senior Division, Mangaon, Raigad-Alibag, shall comprise of the local limits of the Revenue Tehsils of Mahad, Poladpur, Shrivardhan, Mhasala, Mangaon, Tala, Roha and Pali in Raigad-Alibag District and the said Tehsils which were heretofore included within the local limits of the ordinary jurisdiction of the Civil Judge, Senior Division, at Alibag shall be excluded therefrom.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

N. V. JIWANE,
Legal Advisor-*cum*-Joint Secretary
to Government.